**रिझर्व बँक ऑफ इंडिया**
**विदेशी मुद्रा विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**मुंबई - ४०० ००१**

---

**आरबीआय २०११-१२/१७३**
**ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १२** **सप्टेंबर १५, २०११**

प्रति
विदेशी मुद्रेमध्ये व्यापार करणाऱ्या सर्व बँका

महोदय/महोदया,

**भारतातील रहिवाश्यांनी ठेवलेली बचतखाती - संयुक्त धारक - उदारीकरण**

प्राधिकृत डीलर (एडी) बँकांचे लक्ष, फेमा अधिसूचना क्र. ५ दि मे ३, २००० च्या विनियम २(६) कडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार अनिवासी भारतीय (एनआरआय) म्हणजे भारताची नागरिक किंवा भारतीय वंशाची असलेली भारताबाहेर राहणारी व्यक्ती.

२. विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली असलेल्या व्यक्तींना असलेल्या सुविधांचा आढावा घेण्याऱ्या समितीने तिच्या अहवालात शिफारस केली आहे की, निवासी व्यक्तींना, अनिवासी जवळच्या नातलगांना (कंपनीज अधिनियम, १९५६ मध्ये व्याख्या केल्यानुसार), त्यांच्या निवासी बँक खात्यांमध्ये, संयुक्त खातेधारक म्हणून समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात यावी.

३. पुनरावलोकन केल्यानंतर असे ठरविण्यात आले की, भारतात रहिवासी असलेल्या व्यक्तींना, त्यांच्या निवासी बँक खात्यात, अनिवासी जवळच्या नातेवाईकांना (कंपनीज अधिनियम १९५६ च्या कलम ६ मध्ये व्याख्या समाविष्ट केल्यानुसार), 'आधीचा किंवा उत्तरजीवी' धर्तीवर, संयुक्त खातेधारक म्हणून समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात यावी. तथापि, असे अनिवासी भारतीय जवळचे नातलग, निवासी खातेधारकांच्या ह्यातीत ते खाते चालविण्यास पात्र असणार नाहीत.

४. एडी बँकांनी ह्या परिपत्रकातील मजकूर त्यांच्या ग्राहकांच्या नजरेस आणावा.

५. ह्या परिपत्रकातील निदेश, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ च्या ४२) च्या कलम १०(४) आणि ११(१) खाली दिले गेले असून, कोणत्याही कायद्याखाली आवश्यक असलेल्या परवानगी/मंजुरीच्या विरोधात/विपरीत असे नाहीत.

आपली
(मीना हेमचंद्रा)

प्रभारी मुख्य व्यवस्थापक